# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य अग्निशमन विभाग

दि.१४/०४/२०२४

## वसई विरार शहर महानगरपालिकेत 'अग्निशमन सेवा सप्ताहास' सुरुवात

वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य अग्निशमन केंद्र आचोळे येथे आज दि.१४ एप्रिल २०२४ रोजी अग्निशमन सेवा दिनानिमित्त मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार यांच्या शुभहस्ते अग्निशमन ध्वजास मानवंदना देऊन सलामी देण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांकडून शूरवीर हुतात्म्यांना पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली देण्यात आली तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व 'अग्निशमन सेवा सप्ताह' कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

या 'अग्निशमन सेवा सप्ताहाच्या' उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावरून बोलताना मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी अग्निशमन सेवा सप्ताहाविषयी व अग्निशमन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवांविषयी उपस्थितांना माहिती दिली. यावेळी मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय व उपस्थित मान्यवरांकडून अग्निशमन कर्मचाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. सदर प्रसंगी गायिलेल्या अग्निशमन गीताने वातावरणात उत्स्फूर्त अशी उर्जा निर्माण झाली. यावेळी अग्निशमन साहित्य प्रदर्शनी ठेवण्यात आली होती, या अग्निशमन साहित्यांबद्दल उपस्थित मान्यवरांना माहिती देण्यात आली. तदनंतर जनजागृती साठी अग्निशमन विभागातील वाहनांच्या रॅली करिता माननीय आयुक्त महोदयांनी ध्वज दाखवून शुभारंभ केला.

या कार्यक्रमास मा.आयुक्त तथा प्रशासक श्री.अनिलकुमार पवार, अतिरिक्त आयुक्त श्री.रमेश मनाळे, मुख्य लेखापरीक्षक श्री.सुरेश बनसोडे, उप-आयुक्त श्री.सदानंद पुरव, कार्यकारी अभियंता श्री.प्रदीप पाचंगे, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री.दिलीप पालव, अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी, व इतर मान्यवर उपस्थित होते.

दि.१४ ते २० एप्रिल, २०२४ या कालावधीत 'अग्निशमन सेवा सप्ताह' साजरा करण्यात येत असून अग्निशमन विभागामार्फत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील निश्चित केलेल्या ठिकाणी व दिनांक, वेळेनुसार अग्निशमन वाहने व साहित्यासह प्रात्यक्षिके, पथनाट्यासह जनजागृती इ. विविध कार्यक्रम सादर करण्यात येत आहेत. तरी सदरील प्रात्यक्षिके, पथनाट्य पाहण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहून या 'अग्निशमन सेवा सप्ताहात' सहभागी व्हावे असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

**मुख्य अग्निशमन विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**